आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ फेब्रुवारी २०२५ गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्र प्रथम हेच केंद्र सरकारचं विकासाचं मॉडेल असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पुनरुच्चार
- बेकायदेशीररित्या परदेशात राहणाऱ्या नागरिकांना मायदेशी परत पाठवण्याची प्रक्रिया नवीन नसून सामान्य असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं संसदेत निवेदन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सोमवारी परीक्षा पे चर्चा मधून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार
- रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर उद्या सकाळी पतधोरण आढावा समितीच्या बैठकीतले निर्णय जाहीर करणार

**आणि**

- इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताची विजयाकडे वाटचाल

**<><><><><>**

राष्ट्र प्रथम हे आमच्या सरकारचं विकासाचं मॉडेल आहे. सबका साथ सबका विकास यावर यात भर दिल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केला. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. राष्ट्रपतींचं भाषण प्रेरक, प्रभावी आणि भविष्याची दिशा देणारं होतं. देशाचा विकसित करणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे

आणि देशातले युवक विकसित भारत घडवण्यासाठी झटत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात जितक्या गरीबांचं सशक्तीकरण झालं तितकं यापूर्वी कधीही झालं नव्हतं. आमचं विकासाचं मॉडेल तुष्टीकरणावर नव्हे तर संतुष्टीकरणावर आधारित असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. केंद्र सरकार गरीब आणि वंचितांसह इतर घटकांसाठी केलेल्या विविध कामांची माहिती त्यांनी यावेळी दिली. देशातल्या साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याला सरकारचं प्राधान्य आहे. कौशल्य विकास, आर्थिक सर्वसमावेशन आणि औद्योगिक विकासावर सरकारचा भर आहे, असं ते म्हणाले. गेल्या काही वर्षात मत्स्योत्पादन आणि निर्यात दुप्पट झाली, खेळण्यांची निर्यात तिप्पट वाढल्याचा उल्लेख त्यांनी केला. काँग्रेसच्या राजकारणावर आणि काँग्रेस सरकारच्या कार्यकाळावर त्यांनी सडकून टीका केली. काँग्रेसनं केवळ एकाच कुटुंबाला प्राधान्य दिलं. त्यांनी संविधान निर्मात्यांच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष केलं. सरकारच्या विरोधात बोलले किंवा सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही म्हणून काँग्रेसनं अनेक कलाकारांवर निर्बंध लादल्याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली.

<><><><><>

बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांना मायदेशी परत पाठवण्याची प्रक्रिया नवीन नसून ही सामान्य प्रक्रिया आहे, आपले नागरिक इतर देशात बेकायदेशीररित्या राहत असतील तर त्यांना परत आणणं हे आंतरराष्ट्रीय कायद्यामधे सामान्यपणे स्वीकारलेलं तत्व आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री

एस. जयशंकर यांनी सांगितलं. अमेरिकेने भारतीय नागरिकांची मायदेशी रवानगी केल्याप्रकरणी विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर जयशंकर यांनी आज राज्यसभेत आणि लोकसभेत निवेदन दिलं. मायदेशी पाठवण्यात येणाऱ्या लोकांना चुकीची वागणूक दिली जाणार नाही यासाठी अमेरिकी प्रशासनाच्या संपर्कात असल्याचं त्यांनी सांगितलं. कायदेशीर स्थलांतराला प्रोत्साहन देणं आणि बेकायदेशीर स्थलांतराला विरोध करणं हे सार्वजनिक हिताचं आहे, असंही जयशंकर म्हणाले. २००९ मध्ये इतर देशातून ७३४ भारतीयांना माघारी पाठवण्यात आलं. गेल्यावर्षी ३६८ जणांची मायदेशी रवानगी झाली होती, असंही ते म्हणाले.

**अमेरिकेने** भारतीय नागरिकांना ज्याप्रकारे मायदेशी पाठवलं त्यामुळे देशवासियांच्या भावना दुखावल्या आहेत, असं द्रमुकचे खासदार तिरुची सिवा म्हणाले. **परराष्ट्र** व्यवहार मंत्र्यांचं निवेदन हे देशाच्या नागरिकांच्या बाजूचं नसून अमेरिकेच्या नागरिकांना परत पाठवण्याच्या धोरणाच्या बाजूचं वाटलं असं तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले म्हणाले. तर अशा बेकायदेशीर स्थलांतराला मदत करणाऱ्या बेकायदेशीर संस्थांवर कारवाई करायचा सरकारचा विचार आहे का, असा प्रश्न माकपचे खासदार जॉन ब्रिटास यांनी विचारला.

**<><><><>**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात देशभरात २५ कोटींहून अधिक रोजगारनिर्मिती झाल्याची माहिती राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी लोकसभेत आज एका लेखी उत्तरात दिली. उत्पादन क्षेत्रात ७ कोटींहून

अधिक जणांना रोजगार मिळाला असून सेवा क्षेत्रात हीच संख्या १७ कोटी इतकी आहे, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

<><><><><>

विकसित भारताचं पंचप्राण ध्येय साध्य करण्यासाठी महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणं गरजेचं असून या क्षेत्रात शतावरी ही वनस्पती महत्त्वाची भूमिका बजावेल, असं प्रतिपादन आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केलं. शतावरी - उत्तम आरोग्यासाठी या देशव्यापी मोहीमेला आज जाधव यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारी म्हणजेच १० फेब्रुवारीला संवाद साधणार आहेत. परीक्षेच्या ताणाचं व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं प्रधानमंत्री या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मधे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले प्रत्येकी ३६ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. यंदा या कार्यक्रमाचे एकूण ८ भाग होणार असून उर्वरित भागात विविध क्षेत्रातल्या महत्त्वाच्या व्यक्ती त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगणार आहेत.

<><><><><>

नवीन प्राप्तीकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार असून विधेयकाचा मसुदा उद्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर होण्याची शक्यता असल्याचं केंद्रीय अर्थसचिव तुहीन कांत पांडे यांनी सांगितलं. नवी दिल्लीत

एका व्यापारी संघटनेनं आयेजित केलेल्या कार्यक्रमात आज ते बोलत होते. नवीन विधेयकात धोरणात्मक बदल फारसे नाहीत, मात्र लांबलचक वाक्य आणि क्लिष्ट रचना टाळून सर्वांना समजेल अशी सोपी भाषा वापरली आहे, असं ते म्हणाले. हे विधेयक मंजूर झाल्यावर १९६१च्या प्राप्तीकर कायद्याची जागा घेईल.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा, उद्या सकाळी १० वाजता पतधोरण समितीच्या बैठकीतले निर्णय जाहीर करतील. मंगळवारपासून पतधोरण आढावा समितीच्या बैठकीला सुरुवात झाली आहे. रिझर्व बँकेनं फेब्रुवारी २०२३ नंतर रेपो दरात कोणताही बदल केला नसून, सध्या तो ६ पूर्णांक ५ दशांश टक्के इतका आहे. सुमारे ५ वर्षांनंतर रिझर्व्ह बँक उद्या व्याजदर कपात करेल, असा अंदाज अर्थतज्ञांनी व्यक्त केला आहे.

**<><><><>**

मध्यप्रदेशमध्ये शिवपुरी जिल्ह्यातल्या बेहता गावात आज भारतीय हवाई दलाचं लढाऊ विमान कोसळलं. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघाताचं कारण अद्याप स्पष्ट नसून, भारतीय हवाई दलानं या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<><><><>**

नायजेरियाच्या वायव्येकडच्या भागातल्या एका शाळेत काल लागलेल्या आगीत १७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. झामफारा राज्यातल्या कौरा नमोदा जिल्ह्यात ही दुर्घटना घडली. त्यावेळी शाळेत १०० विद्यार्थी उपस्थित होते

अशी माहिती नायजेरियाच्या आपत्कालीन प्रतिसाद संस्थेनं दिली.

<><><><><>

अमेरिकेत लॉसएंजेलिस काऊंटीला उध्वस्त करणाऱ्या अलीकडच्या दोन मोठ्या वणव्यांमध्ये अंदाजे १६४ अब्ज डॉलर्स किमतीच्या मालमत्तेचं आणि भांडवली नुकसान झाल्याचा अंदाज आहे. लॉसएंजेलिस इथल्या कॅलिफोर्निया विद्यापीठानं नुकताच याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला.

<><><><><>

अमेरिकेच्या टपाल सेवेने चीन आणि हाँगकाँग या दोन्ही देशांची टपाल सेवा निलंबित करण्याचा निर्णय मागे घेतला आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेल्या शुल्कानंतर ही सेवा निलंबित आली होती.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत पुन्हा तिसऱ्या स्थानावर आला असून महाराष्ट्राकडे सर्वाधिक ८८ पदकं आहेत. त्यात १९ सुवर्ण, ३६ रौप्य आणि ३३ कास्यपदकांचा समावेश आहे.

तीरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात आज महाराष्ट्राच्या शुकमणी बाबरेकर आणि गाथा खडके यांनी मिश्र गटातलं विजेतेपद पटकावलं. तर महाराष्ट्राच्या महिला तिरंदाजांच्या पथकाने सामूहिक रिकर्व्ह प्रकारात बाजी मारली आहे. या पथकात गाथा खडके, वैष्णवी पवार, शर्वरी शेंडे आणि मुक्ता मोदगी यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची विजयाकडे वाटचाल सुरु आहे.

नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर आज दुपारी सुरु झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि ४७ षटकं ४ चेंडूत सर्व गडी गमावून २४८ धावा केल्या. भारतातर्फे हर्षित राणा आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. रविंद्र जडेजानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे ६०० बळींचा टप्पा गाठला.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. संघाच्या १९ धावा झाल्या असताना यशस्वी जयस्वाल १७ धावांवर, तर पाठोपाठ रोहीत शर्मा २ धावा काढून बाद झाला. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेल यांनी अर्धशतक केलं. सध्या गिल ८१ धावांवर खेळतो आहेत.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ३४ षटकात ४ बाद २२२ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//